१४ व्या वित्त आयोगांतर्गत कार्यरत न्यायालयाचे नुतनीकरण (Re-designing of Existing Courts) <u>या घटकांतर्गत प्रशासकीय मान्यता देणेबाबत.</u>
(रु. ५० लक्षपेक्षा अधिक रकमेचे प्रस्ताव)

महाराष्ट्र शासन

विधि व न्याय विभाग

शासन निर्णय क्रमांक: चौविआ १२१६/प्र.क्र.१०/का- नऊ

मंत्रालय, मुंबई -४०० ०३२,

दिनांक :- ३१ जुलै, २०१९

<u>पहा :</u>
१. विधि व न्याय विभाग, शासन निर्णय क्र. चौविआ- १२१६/प्र.क्र.१०/का-९ दि. ०९ मार्च, २०१६
२. दि. २८ मार्च, २०१६ रोजी घेण्यात आलेल्या उच्चस्तरीय संनियंत्रण समितीच्या बैठकीचे दि. १६ मे, २०१६ चे इतिवृत्त.
३. विधि व न्याय विभाग, शासन निर्णय क्र. चौविआ- १२१६/प्र.क्र.१०७/१६/का-नऊ दि. १० नोव्हेंबर, २०१६
४. दि. २८.०२.२०१९ रोजी घेण्यात आलेल्या उच्चस्तरीय संनियंत्रण समितीच्या बैठकीचे दि.०७.०३.२०१९ चे इतिवृत्त.

<u>प्रस्तावना :</u>

१४ व्या केंद्रीय वित्त आयोगाने शिफारस केलेल्या "न्याय व्यवस्थेचे सक्षमीकरण" (Strengthening the Justice Sector) या प्रयोजनाकरीता सन २०१५-२०१६ ते २०१९-२०२० या ५ वर्षाच्या कालावधीकरीता महाराष्ट्र राज्यासाठी रुपये १०१४ कोटी इतका निधी नमुद केलेला आहे. १४ व्या वित्त आयोगांतर्गत एकूण ११ घटक आहेत, त्यामध्ये कार्यरत न्यायालयाचे नुतनीकरण हा एक घटक आहे. या घटकासाठी ५ वर्षाच्या कालावधीकरिता रु.२२८ कोटी एवढा निधी दर्शविलेला आहे. १४ व्या वित्त आयोगाने केलेल्या शिफारशीची कार्यक्षमरित्या अंमलबजावणी करण्यासाठी दि.०९.०३.२०१६ रोजी उच्चस्तरीय संनियंत्रण समिती गठित करण्यात आलेली आहे. या समितीची प्रथम बैठक दि.२८.०३.२०१६ रोजी पार पडली. या बैठकीमध्ये मा. उच्च न्यायालयाकडुन प्राप्त झालेल्या कृती आराखड्यास तत्वतः मान्यता देण्यात आली. या बैठकीचे इतीवृत्त दि.१६.०५.२०१६ रोजी निर्गमित करण्यात आले. त्यामध्ये न्यायालयाच्या नुतनीकरणाच्या ज्या प्रस्तावाची किंमत रु. ५० लक्षपेक्षा अधिक असेल असे

प्रस्ताव मान्यतेसाठी उच्चस्तरीय संनियंत्रण समितीसमोर सादर करण्याचे ठरले. मा. उच्च न्यायालयाकडून प्राप्त झालेल्या व सार्वजनिक बांधकाम विभागाच्या तपासणीअंती ज्या प्रस्तावाची किंमत रु. ५० लक्षपेक्षा अधिक आहे, असे दोन प्रस्ताव दि.२८.०२.२०१९ रोजी उच्चस्तरीय संनियंत्रण समितीच्या मान्यतेसाठी सादर केले असता त्यावर चर्चा होऊन सदर प्रस्तावास उच्चस्तरीय संनियंत्रण समितीने सहमती दर्शविली. त्यानुसार रु. ५० लक्ष मर्यादेच्या पुढील रकमेच्या दुरुस्तीच्या कामांना शासनाच्या मान्यतेने प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार प्रशासकीय विभागास देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय :</u>

१४ व्या वित्त आयोगांतर्गत “न्याय व्यवस्थेचे सक्षमीकरण” (Strengthening the Justice Sector) या प्रयोजनासाठी शिफारस केलेल्या "कार्यरत न्यायालयाचे नुतनीकरण" (Re-designing of Existing Courts) या घटकाच्या बाबतीत उच्चस्तरीय संनियंत्रण समितीच्या दि. २८.०२.२०१९ रोजीच्या बैठकीमध्ये झालेल्या निर्णयानुसार रु. ५० लक्ष मर्यादेच्या पुढील रकमेच्या राज्यातील सोबत जोडलेल्या यादीतील २ न्यायालयीन इमारतीच्या दुरुस्तीच्या कामांना शासनाच्या मान्यतेने प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार प्रशासकीय विभाग म्हणुन विधि व न्याय विभागास देण्यात येत आहे.

२. सदर प्रकरणी वित्तीय अधिकार नियम पुस्तिका, १९७८, भाग-पहिला, उपविभाग-एक ते पाच अन्वये प्रदान करण्यात आलेल्या वित्तीय अधिकारामध्ये सुधारणा करण्याबाबतच्या वित्त विभागाच्या, शासन निर्णय क्र.विअप्र-२०१३/ प्र.क्र.३०/ २०१३/ विनियम, भाग-२, दि. १७.०४.२०१५ मधील उपविभाग-५, अ.क्र. १० परिच्छेद १३४ मधील स्तंभ ६ मध्ये विहित केलेल्या पुढील अटींची पूर्तता करण्यात यावी.

i. महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम विभाग, नियमपुस्तिकेमधील प्रशासकीय मान्यता देण्याच्या नियमांच्या व तद्अनुषंगीक नियमांचे अनुपालन करण्यात यावे.

ii. दुरुस्तीचे काम विहित निविदा पध्दती अवलंबून सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत संबंधित प्रशासनिक विभागांकडे कार्यकारी अभियंता किंवा त्यावरील दर्जाचे पद असल्यास प्रशासनिक विभागांमार्फत कंत्राटदाराची नेमणूक करुन करण्यात यावे.

iii. अर्थसंकल्पीय तरतूद उपलब्ध असली पाहीजे.

३. सदर अधिकार हे १४ व्या वित्त आयोगातील कार्यरत न्यायालयाचे नुतनीकरण (Re-desiging of Existing Courts) या घटकापुरतेच मर्यादेत राहतील व ते १४ व्या वित्त आयोगाच्या कालावधीपर्यंतच अमलात राहतील.

४. हे आदेश उच्चस्तरीय संनियंत्रण समितीच्या मिळालेल्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहेत.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०८०२१५४६२७३११२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

Amogh Shyamkant Kaloti

Digitally signed by Amogh Shyamkant Kaloti
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Law and Judiciary Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=1f733daf00a6028414c43d0cc10d82acab3b732c4edd56e818f8a3b355588753, serialNumber=9ebeebf21dc54ceec51e6d5ffc84bb94ca6af89497279007d66e97dc13547037, cn=Amogh Shyamkant Kaloti
Date: 2019.08.02 15:55:54 +05'30'

(अ. श्या. कलोती)

विधि सल्लागार-नि-सह-सचिव

प्रति,

१) मा. महाप्रबंधक, उच्च न्यायालय, मुंबई.
२) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा) एक/दोन, महाराष्ट्र, मुंबई/नागपूर
३) मा. मुख्य सचिवांचे उप सचिव, मुख्य सचिवांचे कार्यालय, मंत्रालय, मुंबई.
४) अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
५) अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
६) अपर मुख्य सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई.
७) प्रबंधक (निरीक्षणे-१ व २), उच्च न्यायालय, मुंबई.
८) प्रबंधक (Central Project Co-ordinator- eCourts Project), उच्च न्यायालय, मुंबई.

९) प्रबंधक (अर्थसंकल्प व वित्त), उच्च न्यायालय, मुंबई.
१०) संचालक, अभियोग संचालनालय, मुंबई.
११) सदस्य सचिव, महाराष्ट्र विधि सेवा प्राधिकरण, मुंबई.
१२) सहसंचालक, महाराष्ट्र ज्युडीशिअल अकादमी, उत्तन, ठाणे.
१३) सहसंचालक, न्यायिक अधिकारी प्रशिक्षण संस्था, नागपूर.
१४) सह सचिव (सेवा), विधि व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई.
१५) उप सचिव, महाराष्ट्र विधि सेवा प्राधिकरण, मुंबई.
१६) वित्त विभाग (कार्या. व्यय-५, अर्थसंकल्प-११, वित्त आयोग कक्ष, विनियम)
१७) विधि व न्याय विभागातील सर्व कार्यासने व शाखा.
१८) निवडनस्ती- कार्या. ९.

<u>विधि व न्याय विभाग/का-९</u>

१४ व्या वित्त आयोगांतर्गत कार्यरत न्यायालयाचे नुतनीकरण (Re-designing of Existing Courts) या घटकांतर्गत (रु. ५० लक्षपेक्षा अधिक रकमेचे प्रस्ताव)

अ.क्र.	जिल्हा	न्यायालयाचे नाव	रक्कम
०१	वर्धा	जिल्हा व सत्र न्यायालय, वर्धा	रु.८७,९७,८०५/-
०२	औरंगाबाद	मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद	रु.३,०३,३७,०३७/-